अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालय
मुंबई
आवक क्र. 1992
दिनांक 7 DEC 2011
फाईल क्र.
आवक लिपिक सही

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण- २०१०/९५७/प्र.क्र.१६८/नवि-२०
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २० ऑक्टोबर, २०११.

प्रति,

आयुक्त सर्व महानगरपालिका,

आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचलनालय,
वरळी, मुंबई.

विषय : - इमारतींमधील अग्निशमन यंत्रणा
भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता, २००५ च्या
भाग-४ मधील तरतुदींचे पालन करणेबाबत.

महोदय,

बृहन्मुंबई क्षेत्रातील बोरीवली व वडाळा, त्याचप्रमाणे देशातील इतर काही नागरी क्षेत्रांत लागलेल्या भीषण आगीत सकृत दर्शनी दिसुन आले की विद्युत यंत्रणेतील दोषामुळे संपूर्ण इमारतीत आग पसरली असतांना निकास मार्गात (Fire Exit) मोठया प्रमाणात अडथळे असल्यामुळे तेथे राहणाऱ्या लोकांना बाहेर पडता न आल्यामुळे त्यांना मोठया प्रमाणात जीव गमवावा लागला. वडाळा, बृहन्मुंबई येथील कार्नेशन इमारतीच्या अग्निशमन यंत्रणेत अनेक दोष ( होज पाईप चालु अवस्थेत नसणे, आग विझविण्यासाठी आरक्षित असलेल्या टाकीत पाणी नसणे, प्रेशर पंप चालु नसणे, रेफ्युज एरियात डोअर स्टॉपर असणे इत्यादी बाबी) असताना सदर इमारतीस अग्निशमन अधिकाऱ्यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच भारतीय इमारत संहिता २००५ च्या भाग- ४ येथील कलम ४.६.२ नुसार १५ मीटर व त्यापेक्षा उंच तसेच ५०० स्के. मीटरचा परिसर असलेल्या इमारतींच्या प्रत्येक मजल्यासाठी किमान दोन जीने (Staircases) असणे आवश्यक असताना राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रातील बांधलेल्या इमारत्तींना केवळ एकच जीना (Stair-cases) असलेल्या बांधकाम आराखडयास मान्यता दिली जात असल्याचे दृष्टिपथात येत आहे. ही बाब बेकायदेशीर असुन नियमबाहय आहे.

२.	वरील घटना होऊ नयेत तसेच आगीसारख्या दुर्घटना घडल्यास जीवीत हानी होऊनये यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रातील इमारतीच्या बांधकाम आराखडयास मंजुरी देताना भारतीय इमारत संहिता २००५ च्या भाग- ४ मधील तरतुंदीचे पालन केले आहे याची खात्री करावी. त्याचप्रमाणे अशा इमारतीत आवश्यक ती अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यांत आली आहे याचे प्रमाणपत्र अग्निशमन अधिकाऱ्याने दिल्यानंतर अशा इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यांत यावे.

३.	अन्यथा भारतीय इमारत संहिता २००५ च्या भाग- ४ मधील तरतुदींचा भंग करुन ***ना हरकत प्रमाणपत्र*** देणाऱ्या अधिकाऱ्यास व्यक्तीशः जबाबदार धरण्यांत येऊ न कर्तव्यच्युती केल्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घेण्यात यावी.

(सीमा ढमढेरे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,